REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाविलास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ३
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।

—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ८ पुणें, बुधवार, तारीख ४ मार्च, १९४२ अंक १

## न्यायमूर्ति रानड्यांचे
## तीन अप्रसिद्ध लेख प्रसिद्ध झाले

**PLEA FOR PROTECTIONIST POLICY**

**INDIAN SUGAR INDUSTRY**

न्यायमूर्ति रानडे यांनीं १८९९ सालीं ' टाइम्स ऑफ इंडियांत ' स्वदेशी साखरेच्या धंद्यासंबंधीं लिहिलेले महत्त्वाचे तीन लेख, प्रो. वा. गो. काळे ह्यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध करण्यांत आले आहेत.

व्यवस्थापक, ' अर्थ ', पुणें ४

ह्या पत्त्यावर आठ आण्यांचीं तिकिटें पाठवून लेखांची प्रत मागवावी.

## श्रीराम सिल्क मिल्स लि., बंगलोर

[ कंपनीनें १९४० अखेर ६ टक्के डिव्हिडंड वांटला आहे. ]

युद्धसाहित्यपुरवठा–खात्याची पॅरेशूटकरितां लागणाऱ्या रेशमी कापडाची ऑर्डर पुरी करण्यासाठी लागणाऱ्या मांडवलाकरितां तूर्त एकूण रु. १ लक्षाच्या रकमेपर्यंत

## ठेवी घेणें आहेत

व्याजाचा दर ४॥ ते ६ टक्के. ठेव किमान रु. ५०० ची असावी. ठेवीवरील व्याज दर सहा महिन्यांनीं दिलें जातें.

श्रीराम सिल्क मिल्स लि., श्रीरामबाग, बसपनगुडी, बंगलोर.

नारायण गोविंद नाईक, ( माजी अध्यक्ष, म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ) मॅनेजिंग डायरेक्टर

आमच्या कारखान्यांतील माल मुंबईस बॉम्बे स्वदेशी को–ऑपरेटिव्ह स्टोअर्समध्यें व पुण्यास लक्ष्मी रोडवरील रे म्यूझिअमच्या व्यापार–संवर्धन–गृहांत पहा.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

वक्तशीर आणि मनपसंत काम करून देणारे

## मोहन वॉच कंपनी

रेग्युलेशन मोफत

कॉमनवेल्थ बिल्डिंगसमोर लक्ष्मी रोड, पुणें २.

**महायुद्धाची जाणीव !** कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

# विविध माहिती

### सिलोनला अन्नपुरवठा पाहिजे

हिंदुस्थानाकडून कांहीं अन्नपुरवठा मिळविण्याकरितां सिलोन सरकारचे कृषिमंत्रि दिल्लीस आले आहेत.

### न्यूयॉर्क येथें ब्रिटिश सैन्य

कांहीं ब्रिटिश सैन्य न्यूयॉर्क येथें दाखल झालें आहे.

### सुताच्या पुरवठ्याची योजना

विणकऱ्यांना सध्या सुताच्या पुरवठ्याबाबत अतिशय अडचण भासत आहे. कित्येकांनीं सुताचा साठा करून ठेवला आहे, ते वास्तविक गिरणीवाले अथवा व्यापारीहि नाहींत. हिंदुस्थान सरकारनें विणकऱ्यांस सुताचा पुरवठा नीट व्हावा ह्या दृष्टीनें एक योजना केली आहे, तिचे अन्वयें ज्याचे जवळ सरकारी परवाना नाहीं अशा कोणासहि सुताची विक्री करतां येणार नाहीं.

### प्रिन्सिपॉल गाडगीळ ह्यांची नेमणूक

प्रिन्सिपॉल धनंजयराव गाडगीळ ह्यांची रिझर्व्ह बँकेच्या मुंबई विभागाच्या लोकल बोर्डावर नेमणूक झाली आहे. मुंबई, कलकत्ता, दिल्ली, मद्रास व रंगून ह्या पांच विभागाकरितां पांच बोर्डें आहेत. त्या बोर्डांवरील सभासदांपैकी, पांच सभासद तेथें नोंदलेल्या भागिदारांनीं निवडावयाचे असतात व ज्यास्तींत ज्यास्त तिघांची नेमणूक मध्यवर्ती बोर्डाकडून केली जाते. हे तिघेहि रिझर्व्ह बँकेच्या स्थानिक विभागांत नोंदलेले बँकेचे भागीदार असावे लागतात. शेती व सहकार ह्यांच्या हितसंबंधांच्या प्रतिनिधींचा सल्ला बँकेस मिळावा ह्या दृष्टीनें ह्या तिघांची निवड केली जाते. मध्यवर्ती मंडळ ज्या वेळीं व ज्यासंबंधी सल्ला विचारील तो देणें व मध्यवर्ती मंडळ जीं कामें सोपवील तीं करणें, हें लोकल बोर्डाचें कार्यक्षेत्र आहे.

### हवाई हल्ल्याबाबत चौकशी

ऑस्ट्रेलियाच्या डारविन बंदरावर जपाननें हवाई हल्ला केला, त्यासंबंधांत पूर्ण चौकशी करण्याकरितां ऑस्ट्रेलियन सरकारनें कांहीं वरिष्ठ अधिकारी नेमले आहेत.

### अमेरिका-ग्रेट ब्रिटन करार

लेंड-उधार पद्धतीनें अमेरिका ग्रेट ब्रिटनला मालाचा पुरवठा करीत आहे. पर्ल बंदरावरील हल्ल्यापासून हा पुरवठा तिपटीनें वाढला आहे. जानेवारी, १९४१ मध्यें ह्या पद्धतीनें ग्रेट ब्रिटनला ४६ कोटि, २० लक्ष डॉलर्सची मदत मिळाली. आतांपर्यंत ग्रेट-ब्रिटनकडे लीज-लेंड पद्धतीनें २०० कोटि रुपयांचा माल आला आहे. ह्या पद्धतीच्या मूळ तत्त्वांस अनुसरून अमेरिका व ग्रेट ब्रिटन ह्यांचेमध्यें नुकताच एक करार झाला आहे.

### दि फेमस इं. कं. लि.

वरील नांवाची एक विमा कंपनी मुंबई येथें नोंदण्यांत आली आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल २५ लक्ष रुपये असून विक्रीस काढलेलें भांडवल ६ लक्ष रुपये आहे. २½ लाखांचें भांडवल खपल्यावर कंपनी कामास प्रारंभ करील. त्यापैकीं ८० हजारांचे भाग मेमोरँडम व आर्टिकल्सवर सही करणारांनीं घेतलेले आहेत. मॅनेजिंग डायरेक्टरास दरमहा १ हजार रुपये पगार ठरला आहे, त्यांत वार्षिक शंभर रुपयांची वाढ होऊन तो १½ हजारांपर्यंत जाईल. नवीन कामाच्या हप्त्यांवर ५% व चालू कामाच्या हप्त्यांवर १½% कमिशनहि त्यांस मिळावयाचें आहे.

### ओगले ग्लास वर्क्स लि.

वरील कंपनीला १९४१ सालअखेर एकूण २ लक्ष, २८ हजार रुपये उत्पन्न झालें. नेहेमींचे खर्च वजा टाकून, रौप्य ज्युबिलीचा सर्व खर्च, ३१,२०० रुपयांच्या जुन्या इमारती वगैरे, २५,००० रुपयांची गुडवुइल, २४ हजार रुपयांचा घसारा, इत्यादि लिहून टाकून निवळ नफा ९८,३५६ रुपये राहिला. त्यांतून १० हजार रुपये रिझर्व्ह फंडांत, १५ हजार रुपये डि. ई. फंडांत, २० हजार रुपये बोनससाठी, ३ हजार रुपये औंध संस्थानास रॉयल्टीकरितां, ह्याप्रमाणें तरतूद करून ८% दरानें भागीदारांस डिव्हिडंड देण्याकरितां ४८ हजारांचा विनियोग करण्यांत आला. आतां कंपनीनें विक्रीस काढलेलें ८ लाखांचें भांडवल खपून गेलें आहे.

### अहमदाबाद प्रांतज रेल्वे कं. लि.

वरील कंपनीनें ९% दराचें इंटेरिम डिव्हिडंड जाहीर केलें आहे. किलिक निक्सन आणि कंपनीकडे रेल्वे कंपनीची मॅनेजिंग एजन्सी आहे.

### चेक्सची देवघेव

मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाउसमध्यें २० फेब्रुवारीअखेर संपलेल्या आठवड्यांत २५ कोटि, ४१ लक्ष रुपयांच्या १,४०,१९० चेक्सची देवघेव झाली.

### बँकांस सुट्टी

मंगळवार, ता. ३ मार्च रोजीं होळीनिमित्त बँकांस सुट्टी आहे.

### कलकत्ता शहरांतील खंदक

कलकत्ता शहरवासीयांचें हवाई हल्ल्यांपासून संरक्षण व्हावें, ह्याकरितां तेथें एकूण ७,६५,३१० फूट लांबीचे खंदक खणण्यांत आले आहेत.

### लोखंड-पोलादाचा तुटवडा

हिंदुस्थानांत लोखंड व पोलाद ह्यांचा फार तुटवडा पडत आहे, तेव्हां कारखान्यांनीं अतिशय काटकसरीनें तें वापरावें; शक्य तेथें त्याचे ऐवजी दुसऱ्या कशाचा तरी उपयोग करावा, असा सल्ला हिंदुस्थान सरकारनें बंगाल गिरणी मालक संघास दिला आहे.

### गिर्यारोहण बंद

हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्यांचें येत्या उन्हाळ्यांत सिमल्यास स्थलांतर होणार नाहीं. व्हाइसरॉय व कमांडर इन चीफ हे सुद्धां सिमल्यास जाणार नाहींत.

### ब्रह्मदेशाकडे जाणारें टपाल

रजिस्ट्रेशन, इन्शुरन्स, पार्सल पोस्ट व साध्या मनिऑर्डरी ह्यांबाबतच्या पोस्टाच्या सवलती ब्रह्मदेशाकडे जाणाऱ्या वस्तूंपुरत्या तात्पुरत्या बंद केल्या आहेत. रजिस्टर्ड अथवा इन्शुअर्ड जिन्नस, पार्सल अथवा मनिऑर्डर हीं ब्रह्मदेशाकडे पाठविण्याकरितां स्वीकारण्यांत येणार नाहींत. एअरमेल व टेलिग्राफिक मनिऑर्डरी स्वीकारल्या जातील.

### करवसुली स्थगित करा

ब्रह्मदेशांतील कित्येक लोक देश सोडून गेले आहेत. अशा अनिश्चित परिस्थितींत ब्रह्मी सरकारनें प्राप्तिवरील कर व जमिनीवरील कर वसूल करण्याचें कांहीं काळ स्थगित करावें, अशी विनति इंडियन मर्चंट्स चेंबरनें ना. अणे यांस तार पाठवून केली आहे.

### निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ८६–१२ |
| सोनें प्रत्येक तोळ्यास ... ... | ५१–४ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ८०–० |

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ६८ |
| २ मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक ... ... | ६९ |
| ३ डिसेंबरमधील आर्थिक उलाढाली ... ... | ७० |
| ४ लॉर्ड डरहॅम... ... | ७० |
| ५ स्फुट विचार... ... बाजारभावांच्या चढउतारांचा क्रम—हिंदुस्थान सरकारचें गिर्यारोहण बंद—दोन मुत्सद्यांचे युद्धविषयक विचार—चीन-हिंदुस्थान सहकार्य—आकडे-शास्त्रविषयक षण्मासिक | ७१ |
| ६ जी. आय. पी. रेल्वे | ७२ |
| ७ सरकारी प्रॉमिसरी नोटा व स्टॉक सर्टिफिकिटें ... | ७३ |
| ८ रानडे शतसांवत्सरिक उत्सव | ७३ |

# अर्थ

बुधवार, ता. ४ मार्च, १९४२

## मध्यवर्ती सरकारचें अंदाजपत्रक

वाढत्या युद्धखर्चामुळें येणारी तूट अंशतः भरून काढण्यासाठी हिंदुस्थान सरकारच्या फडनवीसांस कांहींतरी करवाढ करावी लागणार हें सामान्यतः उघडच दिसत होतें. पुढील वर्षी चालू उत्पन्नाच्या बाबींपासून येणारी मिळकतीची रक्कम व्हावयाच्या खर्चापेक्षां ४७ कोटि रुपयांनीं कमी पडेल असा सर जरेमी रेस्मन ह्यांनीं अंदाज केला असून ही तूट भरून निघण्यास सहाय म्हणून कांहीं करांत वाढ सुचवली आहे. योजलेल्या जादा करांचें उत्पन्न १२ कोटि रुपये होईल आणि तुटींतले बाकीचे ३५ कोटि रुपयें सरकारास कर्जाच्या उपायानें उभे करावें लागतील. युद्ध ही बुडीत खर्चाची बाब पण आवश्यक असल्यानें त्याकरितां राष्ट्रीय कर्ज अपरिहार्यच असतें. तथापि, करांचें उत्पन्न होईल तितकें वाढवण्याचा प्रयत्न सरकार करतें, परंतु ह्या उत्पन्नाच्या वाढीस मर्यादा असल्यानें कर्जाचा मार्ग स्वीकारावाच लागतो. करांमध्यें जनतेचा स्वार्थत्याग येतो, आणि त्या विषयींची निरनिराळया वर्गांची क्षमता आणि पात्रता हीच करवाढीची मर्यादा होय. वाढवल्या जाणाऱ्या करांची युक्तायुक्तता ह्या प्रकारच्या मापानें मोजावी लागते. प्राप्तीवरील कर, आयात जकाती, पोस्टाचे दर व पेट्रोल किंमत हीं उत्पन्नाच्या वाढीचीं साधनें फडनवीसांनीं योजिलीं आहेत. वार्षिक एक हजार ते दोन हजार उत्पन्न असणाऱ्या लोकांस ७५० रुपयांपेक्षां तें उत्पन्न जेवढ्यानें अधिक असेल तेवढ्या रकमेवर दर रुपयास ६ पै ह्या दरानें प्राप्तीवरील कर द्यावा लागेल. ह्या बाबतींत एक सवलत ठेवण्यांत आली आहे, ती अशी कीं, ही कराची आकारणी होईल तिच्या सवापट रक्कम डिफेन्स सेव्हिंज बँक खात्यांत ठेवली गेल्यास ती युद्ध—समाप्तीनंतर एक वर्षानें काढतां येऊन तिच्यावर अडीच टक्के व्याज मिळेल. प्राप्तीच्या करावर सध्या सरचार्ज आहे त्यांत हप्त्याहप्त्यानें वाढावा करण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें कॉर्पोरेशन टॅक्स दीड आणा केला जावयाचा आहे. जादा नफ्यावरील कर ६६⅔ टक्के कायम राहील पण ह्या कराच्या रकमेच्या एक—दशांश, कर देणारा तिच्या एक—पंचमांश देईल तर सरकार भरील आणि हा एक—पंचमांश बाजूस काढून ठेवण्यांत येऊन युद्धानंतर परत देण्यांत येईल आणि त्यावर दोन टक्के व्याजहि त्यास मिळेल. अप्रत्यक्ष करांमधील मुख्य वाढ म्हटली म्हणजे आयात जकाती एकपंचमांशानें अधिक केल्या जातील ही होय. पेट्रोल, कपास व मीठ हे सदरहु वाढीस अपवाद आहेत. पोस्टांतून पाठवावयाच्या पत्राच्या तिकिटाचा दर पांच पैशांचा सहा पैसे होईल आणि तारेचा दर १० आण्यांचा १२ आणे होईल.

एक हजार ते दोन हजार रुपये वार्षिक उत्पन्नापैकीं ७५० रुपयांवरील रकमेवर ६ पै दरानें कर देण्याची योजना आहे तिच्या बाबतींत कराच्या सव्वापटीइतकी रकम अडीच टक्के व्याजानें ठेव म्हणून ठेवली जाण्याची सोय आहे ती, लोकांनीं खर्चांत बचत करून आपला पैसा सरकारी कर्जांत घालावा आणि चलन वाढल्यानें होणाऱ्या बाजारभावांच्या चढीस आळा घालण्यास सरकारास मदत करावी, ह्या हेतूनें देण्यांत आलेली सवलत आहे. उदाहरणार्थ, ज्याची १,२५० रुपये प्राप्ति आहे त्यास ५०० रुपयांवर ६ पै दरानें १५ रु. १० आणे कर द्यावा लागेल. पण त्यानें त्याच्या सवापट म्हणजे दर पंचवीस रुपयांस एक रुपया ह्या प्रमाणांत २० रुपयांची ठेव ठेवल्यास अडीच टक्के व्याज व रकम परत मिळेल, म्हणजे कर माफ होऊन बचत व्याजी राहील. जादा नफ्यावरील कराचे बाबतींत अशाच प्रकारची एक सवलत ठेवण्यांत आली आहे. मोठ्या धंद्यांत नफ्याची बचत होऊन निधि वाढण्यास आणि त्यांचा पुढें भांडवली उपयोग होण्यास सवड मिळावी म्हणून तेथेंहि बचतीची योजना सुचवण्यांत आली आहे. करवाढीच्या ह्या आणि इतर सूचना मध्यवर्ती असेंब्लीच्या लोकनियुक्त सभासदांस रुचल्या नसाव्या असें त्यांनीं काढलेल्या उद्गारांवरून दिसतें. युद्धपरिस्थितीचा आणीबाणीचा प्रसंग लक्षांत घेतां कांहीं करवाढीस मान्यता देणें अखेर त्यांस उचित वाटेल ह्यांत शंका नाहीं. तथापि ज्यापासून सरकारी उत्पन्न फारसें न वाढतां सामान्य जनतेची गैरसोय होते अशा पोस्टाच्या दरांतील वाढीवर असेंब्लींत प्रतिकूल टीका होईल आणि तिचें समाधान फडनवीसांस करावें लागेल. प्राप्तीवरील कराच्या दरांत व सरचार्जमध्यें होणाऱ्या वाढीवरहि अशाच तऱ्हेची टीका झाल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. असल्या वाढीचा परिणाम धंदे व व्यापार ह्यांवर काय होईल ह्याकडे काळजीपूर्वक पहाणें अगत्याचें आहे.

चालू सालाच्या दुरुस्त अंदाजपत्रकाकडे पाहिलें असतां असें दिसून येतें कीं मूळ अजमासापेक्षा सुमारें १६½ कोटि रुपयांनीं उत्पन्न वाढलें आहे, पण त्या बरोबरच खर्च २० कोटींनीं अधिक झाला आहे. ह्यामुळें वर्षअखेरची तूट १४ कोटींची १७ कोटि रुपये होईल असा रंग आहे. येत्या सालची परिस्थिति खालीं दिलेले आंकडे दर्शवतील:—

| | लक्ष रुपये |
|---|---|
| बिनलष्करी खर्च | ५४०७ |
| संरक्षण खर्च | १३३०० |
| एकूण खर्चाचा अंदाज | १८७०७ |
| चालू करांचें उत्पन्न | १४००० |
| तूट | ४७०० |

## डिसेंबरमधील आर्थिक उलाढाली

( ३ )

स्वतःसाठी आणि साम्राज्य सरकारच्या वतीनें युद्धाप्रीत्यर्थ हिंदुस्थान सरकार दर महिन्यास वीस कोटि रुपये खर्च करीत आहे. एवढा पैसा जनतेमध्यें खेळत आहे. त्याच्या खर्चांत कांहीं बचत होऊन त्याचा कांहीं भाग सरकाराकडे परत कर्ज व ठेव यांच्या स्वरूपांत आला पाहिजे ही गोष्ट व्हाइसरॉयांनीं आपल्या श्रोत्यांच्या नजरेस आणली आहे. तिच्याच आनुषंगानें ओघानें येणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या इंग्लंडमधील कर्जासंबंधाच्या एका महत्त्वाच्या बाबीचा उल्लेख येथें करणें आवश्यक आहे. हिंदी सरकार खर्च करतें ह्या देशांत, पण त्याची भरपाई त्यास साम्राज्य सरकाराकडून मिळते लंडनमध्यें, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या लंडनमधील शाखेंत. सरकारच्या खात्यावर हा पैसा जमा होतो आणि तो तेथें अल्प मुदतीनें रोख्यांत गुंतवावा लागतो. हिंदुस्थानच्या खात्यावर जमणारा हा पैसा इकडे कसा परत आणावयाचा हा येथें प्रश्न आहे. हिंदुस्थानचा पैसा लंडनमध्यें गुंतविला जाणें म्हणजे हिंदी सरकार तितक्यापुरतें तेथें धनको बनतें. परंतु हिंदुस्थान सरकारनें इंग्लंडमध्यें ब्रिटिश चलनांत परतफेड व्हावयाचीं कोट्यावधि रुपयांचीं कर्जें रेलवेजच्या व इतर भांडवली धंद्यासाठी मागें काढलेलीं असल्याकारणानें तें सरकार लंडनमध्यें ऋणकोहि आहे. त्या कर्जावरील व्याज पौंडांमध्यें इंग्लंडांत द्यावें लागतें आणि त्याबद्दलच्या देण्याची तरतूद रिझर्व्ह बँकेस करावी लागते. हातीं पैसा आला असतां तो कर्जाऊ देण्यापूर्वी त्यानें स्वतः काढलेलीं मागचीं कर्जें कोणीहि व्यवहारज्ञ मनुष्य अगोदर फेडील हें उघड आहे आणि हीच गोष्ट हिंदुस्थान सरकारनें केली आहे. त्याचीं लंडनमधील कर्जें मुदतबंदी व बिनमुदतीचीं अशीं दोन प्रकारांचीं होतीं त्यांपैकीं मुदतबंदी कर्जांची फेड आपल्या लंडनमधील शिलकेंतून गेल्या वर्षी मार्च महिन्यांत सरकारनें केली. ती शिल्लक साम्राज्य सरकारासाठी होणारा युद्ध सामुग्रीवर खर्च त्या देशांत सारखा वाढत असल्यानें पुन्हां फुगल्यामुळें, बिनमुदत कर्जांची फेड करण्याचें सरकारनें ठरवलें आहे.

हीं बिनमुदत विलायती कर्जें, साडेतीन, तीन व अडीच टक्के व्याजाचीं व सुमारें पावणे सोळा कोटि पौंडांचीं आहेत. त्यांची रुपयांत व्यक्त होणारी रकम अजमासें दोनशें दहा कोटि रुपये भरेल. त्यांतले एक कोटि पौंडांचे ३½ टक्के व्याजाचे, सुमारे निम्म्या रकमेचे रोखे ३½ टक्के व्याजाचे व निम्मे ३ टक्के व्याजाचे आहेत. बिनमुदतीच्या कर्जांची फेड करण्याचा हक्क सरकारास आहे. आणि त्याप्रमाणें सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया ह्यांनीं ३½ टक्के दराच्या कर्जाची फेड १९४३ च्या जानेवारींत आपण करणार आहों अशी एक वर्षाची नोटीस रोखे धारण करणारांस दिली असून ३ व २½ टक्क्यांचे रोखे लोकांनीं आपल्या स्वाधीन करावे असें ब्रिटिश फडनवीशी खात्यानें त्यांस फर्माविलें आहे. तीन व अडीच टक्के व्याजाचे रोखे फेब्रुवारीच्या प्रारंभीं सरकारच्या हातीं येऊन त्यांचे पैसे मार्चमध्यें दिले जातील. सरकारी हुकुमाच्या तारखेस त्या दोन रोख्यांचे बाजारभाव होते त्या भावांनीं फेड केली जाईल. हिंदुस्थान सरकारनें सवरह्र रोखे धारण करणाऱ्या हिंदुस्थानांतील लोकांस ब्रिटिश सरकाराप्रमाणेंच हुकूम काढला आहे. गेल्या वर्षी मुदतबंदी कर्जरोख्यांची फेड सरकारनें केली तेव्हां त्यांच्या मोबदल्यांत नवे हिंदी कर्जरोखे मूळ रोख्यांच्या मुदतीचे व व्याजाचे देण्याची व्यवस्था सरकारनें केली होती. त्या खेपेस नवीन रोखे बदलींत देण्याची तजवीज तूर्त न करण्याचें ठरलें आहे. सध्या तसल्या हिंदी रोख्यांचे बाजारभाव खाली गेले असल्याकारणानें हें धोरण सरकारनें स्वीकारलें असून परिस्थिति अनुकूल होतांच तसे रोखे काढण्यांत येतील असें दिसतें. बिनमुदत रोख्यांच्या फेडीची योजना पुढच्या वर्षी पुरी झाली म्हणजे हिंदुस्थानास बाहेरचें कर्जाचें देणें शिल्लक रहात नाहीं आणि हा देश विलायती कर्जामधून सर्वस्वी मुक्त होईल. ( समाप्त )

## लॉर्ड डरहॅम

ब्रिटिश कॉमन्स सभेंतील नुकत्याच झालेल्या हिंदुस्थानविषयक चर्चेचें वेळीं सर पर्सी हॅरिस हे म्हणाले:—" वंशविषयक प्रश्न सोडविण्याचा ब्रिटिश साम्राज्याचा हा पहिलाच प्रसंग नाहीं. कॅनडा व आफ्रिका येथें हा प्रश्न आपणांपुढें उभा होताच. अमेरिकेचें उदाहरण सोडलें, तर बाकी प्रत्येक ठिकाणीं घटनाविषयक प्रश्न सोडविण्यांत आपण यशस्वी झालों आहों. हिंदुस्थानासंबंधींचा प्रश्न सोडविण्यांत फार दिरंगाई करतां कामा नये. कॅनडाविषयक प्रश्न सोडविण्यास आपणांस लॉर्ड डरहॅम उपयोगी पडले तसे दुसरे एकादे डरहॅम हिंदी प्रश्न सोडविण्यास आपणांस मिळणार नाहींत काय ?"

लॉर्ड डरहॅम ह्यांनीं कॅनडाचा प्रश्न कसा सोडविला ? १७८३ सालीं अमेरिकेंतील १३ वसाहतींनीं आपलें स्वातंत्र्य प्रस्थापित केल्यानंतर फक्त कॅनडाची वसाहत ग्रेट ब्रिटनकडे राहिली. अमेरिकन वसाहतींशीं ग्रेट ब्रिटनचें युद्ध झालें, त्यांत ग्रेट ब्रिटनकडून लढलेले लोक ब्रिटिश ताब्यांतील कॅनडाच्या वसाहतींमध्यें स्थाइक होऊं लागले. हे लोक प्रॉटेस्टंट पंथाचे होते; तर कॅनडांतील लोक फ्रेंच व रोमनकॅथॉलिक होते. फ्रेंच कॅथॉलिक व ब्रिटिश प्रॉटेस्टंट ह्यांचेमध्यें लवकरच बखेडे होऊं लागले. ह्यास उपाय म्हणून १७९१ सालीं कॅनडाचे ऑंटरियो व क्विबेक असे दोन भाग करण्यांत आले, परंतु तेथें अमलांत आणलेली प्रातिनिधिक राज्यपद्धति अयशस्वी ठरली व १८३७ सालीं लॉर्ड डरहॅम ह्यांची कॅनडाच्या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लावण्याचे कामीं योजना झाली. लॉर्ड डरहॅम हे स्वतः कॅनडांत गेले व ब्रिटिश नमुन्याची जबाबदार पद्धति कॅनडांत अमलांत आणण्याचें महत्त्व त्यांनीं आपल्या रिपोर्टांत प्रतिपादन केलें. ह्या रिपोर्टास अनुसरून ब्रिटिश पार्लमेंटनें कॅनडाचे १७९१ सालीं केलेले विभाग रद्द केले व कॅनडाचें एकीकरण केलें. पुढें १८६७ सालीं ब्रिटिश उत्तर अमेरिकेचा विस्तृत कायदा पार्लमेंटनें मंजूर करून कॅनडाच्या राज्यकारभाराविषयक प्रश्न कायमचा सोडविला. लॉर्ड डरहॅम ह्यांच्या रिपोर्टाच्या आधारानें कॅनडांत जें शक्य झालें, तसेंच हिंदुस्थानांतहि होणें शक्य आहे व ह्या दृष्टीनें एक लॉर्ड डरहॅम हिंदुस्थानांत पाठवावा, अशी सर पर्सी हॅरिस ह्यांची सूचना होती.

## स्फुट-विचार

### बाजारभावांच्या चढउतारांचा क्रम

हिंदुस्थानांतील घाउक बाजारभावांच्या चढउतारांची परिस्थिति गेल्या दोन अडीच वर्षांत मागच्या काळाच्या मानानें कशी बदलत आली आहे ह्या विषयींची एकत्रित तुलनात्मक माहिती उपलब्ध झाली आहे ती येथें संक्षेपानें दिली असतां उपयुक्त वाटेल. त्या कल्पनेनें कांहीं ठळक आकडे आम्हीं नमूद करीत आहों. आर्थिक मंदी ह्या देशांत १९३० सालीं चालू झाली तिच्या पूर्वीच्या बाजारभावांच्या मानानें प्रस्तुत युद्धाच्या मागच्या कांहीं वर्षांत बाजारभाव खालावलेले होते. मागील महायुद्धाच्या प्रारंभापूर्वीचे सरासरीचे बाजारभाव १०० होते असें कल्पिलें तर १९२४–२९ ह्या काळांतला आकडा १५२ होता असा हिशेब निघतो. म्हणजे ह्या मुदतींतले बाजारभाव १९१४ च्या मानानें दीडपट होते. पुढें १९३३ मध्यें हें शतमान ८७ झालें. हा आकडा १९३० मध्यें चालू झालेल्या आर्थिक मंदीचा निदर्शक आहे. ही स्थिति थोडी सुधारली तरी १९३९ च्या ऑगस्ट महिन्यांत किंमतींच्या बाजारभावांच्या शतमानाचें प्रमाण १०० च्या वर गेलें नाहीं. १९१४ च्या महायुद्धाचे प्रारंभीं किंमती होत्या तशाच किंमती चालू युद्धाच्या सुरवातीस होत्या हा त्याचा अर्थ आहे. ह्यानंतर कांहीं महिने सट्टयांच्या व्यवहारांमुळें किंमती वर गेल्या आणि युद्धाच्या प्रारंभाच्या महिन्याचे मानानें २९ नीं चढल्या. चढीची ही लाट हळुहळू ओसरून किंमती घटल्या आणि १९४०च्या मध्यास १९३९च्या ऑगस्टपेक्षा केवळ १० टक्यांनीं त्या ज्यास्त होत्या. बाजारभावांचें प्रमाण १९४१ च्या आरंभीं आरंभीं स्थिर झाल्यासारखें दिसलें आणि तें १९३९ च्या मानानें १५ टक्के अधिक होतें. पुढें १९४१ च्या मे महिन्यापासून बाजारभाव चढणीस लागले आणि सप्टेंबरमध्यें ४५ टक्क्यांची वाढ त्यांत झाली. कपाशीसारख्या कच्च्या मालाच्या किंमती मंदीच्या काळाच्या पूर्वींच्या प्रमाणापेक्षा खालींच होत्या, हें विशेष आहे. गहू व तांदूळ ह्यांचे भाव चढीचे रहाण्याच्या मुळाशीं स्वतंत्र कारणें आहेत तीं प्रसिद्ध आहेत. गेल्या वर्षाच्या अखेरीस खाण्याच्या पदार्थींचे घाउक भाव १९३९ च्या ऑगस्ट महिन्याचे मानानें सुमारें ३० टक्क्यांनीं अधिक होते. कच्च्या मालाच्या किंमती मात्र ५० टक्के व पक्क्या मालाच्या ६४ टक्के वाढल्या.

---

### हिंदुस्थान सरकारचें गिर्यारोहण बंद

नव्या दिल्ली शहराची बांधणी करतांना उन्हाळ्यामध्येंहि हिंदुस्थान सरकारच्या कचेऱ्या राजधानींमध्येंच रहाव्या आणि त्यांस सिमल्याचा चढउतार दर वर्षीं करावा लागूं नये असा हेतु त्या योजनेच्या मुळाशीं होता. वर्षांतून सहा महिने सरकारचें ठाणें हिमालयांत हालवलें गेल्यानें त्याचा लोकमताशीं संबंध तुटतो आणि त्या कामीं खर्च होऊन सर्वांची गैरसोयहि होते अशा आशयाच्या टीकेस उत्तर म्हणून सरकारी कचेऱ्या उन्हाळ्यांतहि नव्या दिल्लींत रहाव्या असा बेत करण्यांत आला होता. तथापि, ह्या कल्पनेस मूर्त स्वरूप देण्याच्या बाबतींत दिरंगाई होत आली आहे. कांहीं सरकारी कचेऱ्या दिल्लीस ठेवावयाच्या आणि कांहीं सिमल्यास हालवावयाच्या असा प्रकार मध्यंतरीं चाललेला होता. अलीकडे युद्धामुळें सरकारी कचेऱ्या, अधिकारी व नोकर ह्यांच्या संख्येंत बेसुमार विस्तार झाला असून त्यांच्या रहाण्याची व्यवस्था करणें कठिण झालें आहे. सिमला येथें तर ही गैरसोय विशेषच आहे. युद्धामुळें रेल्वेजची वहातुक मर्यादित करण्याची आवश्यकता तातडीची झाली आहे आणि हिंदुस्थान सरकारचे मंत्रि व मुख्य अधिकारी दिल्लीमध्यें कायमचे राहणेंहि अपरिहार्य आहे. सध्यांची एकूण परिस्थिति लक्षांत घेऊन यंदा सरकारनें आपलें गिर्यारोहण बंद ठेवलें असल्याचें प्रसिद्ध केलें आहे. जागेच्या अभावीं कांहीं किरकोळ कचेऱ्यांचें सिमल्यास उन्हाळ्यांत स्थलांतर होईल, पण मुख्य सरकारी कचेऱ्या व अधिकारी दिल्लीमध्येंच रहाणार आहेत, ही घोषणा योग्य अशीच आहे. तिला अनुसरून व्यवस्था करण्याचें ठरलें नसतें, तर तेंच आश्चर्यमूलक टीकेस कारण झालें असतें. युद्धाच्या आणीबाणीच्या परिस्थितींत मध्यवर्ती सरकारचें ठाणें राजधानींतच संबंध वर्षभर राहणें अगत्याचें आहे. खर्च, औचित्य व कारभाराची कार्यक्षमता ह्यांच्या तिहेरी दृष्टीनें पाहिलें असतां हाच सरळ सिद्धांत निघतो.

---

### दोन मुत्सद्यांचे युद्धविषयक विचार

पॅसिफिक महासागराच्या क्षेत्रांत जपानचें आक्रमण झपाट्यानें होऊन लोकशाही राष्ट्रांस माघार घ्यावी लागल्यानें इंग्लंड व अमेरिका ह्या देशांत आणि सिंगापूरच्या खेदजनक प्रसंगामुळें विशेषतः इंग्लंडमध्यें मंत्रिमंडळावर टीकेचा भडिमार झाला. ब्रिटिश मंत्र्यांमध्यें कार्यक्षमता व तडफ ह्यांचा अभाव असल्यानें मि. चर्चिल ह्यांनीं आपले सहकारी बदलावे अशी मागणी करण्यांत आली. ती स्वीकारून ब्रिटिश मुख्य प्रधानांनीं आपल्या मंत्रिमंडळाची पुनर्घटना केली असून युद्धपरिस्थितीविषयीं मोकळ्या मनानें निवेदन केलें. अनेक रणक्षेत्रांत लढाऊ सामुग्री एकाच वेळीं पुरवावी लागल्यानें आणि रशियास हें सहाय देणें अगत्याचें असल्यानें मलायाच्या बाजूस विमानें भरपूर पुरवणें शक्य झालें नाहीं; सध्या युद्धपरिस्थिति प्रतिकूल झाली आहे हें कबूल केलें पाहिजे; पण रशियाचे अलीकडचे पराक्रम आणि अमेरिकेचें अपूर्व सहकार्य ह्या दोन गोष्टी अत्यंत उत्तेजनकारक आहेत. मि. चर्चिल ह्यांच्या भाषणाचा थोडक्यांत वरीलप्रमाणें सारांश आहे. प्रस्तुत युद्धाकडे दूरदृष्टीनें पाहिलें असतां आशेस भरपूर जागा आहे. कारण इंग्लंड, अमेरिका, चीन व ईस्ट इंडीज ह्यांचे एकत्रित युद्धप्रयत्न फलद्रूप होण्यास थोडा काळ लोटावा लागेल; ह्या अवधींत इंग्लंडमध्यें लोकांनीं एकदिलानें, नेटानें व निश्चयानें आपापलीं युद्धकार्यें चालू ठेवलीं पाहिजेत असा त्यांनीं संदेश दिला. कॉमन्स सभेंत सरकारी धोरणावर पुष्कळ टीका झाली तरी सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांनीं मंत्रिमंडळाच्या वतीनें उत्तरादाखल भाषण केलें, त्यानें ब्रिटिश वृत्तपत्रांचें बरेंच सांत्वन झालें असल्याचें त्यांच्या उद्गारांवरून दिसतें. युद्धधोरणांत नवा जोम व धडाडी उत्पन्न होण्याची आशा त्यांस वाटूं लागली आहे. प्रेसिडेंट रूझव्हेल्ट ह्यांनीं युद्धपरिस्थितीचें पर्यालोचन नुकतेंच केलें, त्यांत अटलांटिक, पॅसिफिक व हिंदी महासागर ह्यांचेमध्यें शत्रूच्या आघातांचा प्रतिकार करून इंग्लंड, रशिया व चीन ह्यांस युद्धसामुग्री पुरवण्याचा आपला कृतनिश्चय त्यांनीं व्यक्त केला. नवीन जहाजें, विमानें, चिलखती गाड्या इत्यादि सामुग्रीची प्रचंड योजना आपण आखली आहे ती पुरी करून जपानचा पूर्ण पाडाव केल्यावांचून

अमेरिकन राष्ट्र रहाणार नाहीं अशी प्रतिज्ञा त्यांनीं केली. मि. रूझव्हेल्ट व मि. चर्चिल ह्यांच्या भाषणांत तत्वतः कितीतरी साम्य आहे. सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीमधूनच विजयाचा मार्ग काढला पाहिजे आणि तो निश्चित निघणार असें दोघांनींहि स्पष्ट बोलून दाखवलें आहे.

---

## चीन-हिंदुस्थान सहकार्य

जनरॅलिसिमो आणि मॅडॅम चिआंग काय शेक ह्यांनीं ह्या देशांत येऊन हिंदुस्थान सरकारचे प्रतिनिधि व लोकांचे पुढारी ह्यांच्यांशीं विचारविनिमय केला. त्याचे दीर्घगामी व महत्त्वाचे परिणाम स्पष्ट दिसूं लागले आहेत. जपानचा पाडाव होण्यास ब्रह्मदेशाच्या बाजूस चिनी व हिंदी सैन्यांनीं एकत्र लढण्याचें महत्त्व किती आहे ह्याची जाणीव त्यांनीं हिंदुस्थान सरकारास करून दिली असली पाहिजे. रंगूनच्या मार्गानें व बर्मारोडनें चीनला जाणारी युद्धसामुग्री तोडणें व त्या देशास असहाय करून टाकणें हा जपानचा प्रस्तुत उद्देश आहे. हिंदुस्थान व चीन ह्यांस जोडणारा नवीन रस्ता चालू करणें आणि हिंदी व चिनी फौजांच्या सहकार्याची व्यवस्था ब्रह्मदेशाच्या बचावासाठी अंमलांत आणणें हा जनरॅलिसिमो चिआंग काय शेक ह्यांच्या हिंदी अधिकाऱ्यांशीं झालेल्या वाटाघाटींचा मुख्य विषय असला पाहिजे. हिंदुस्थान व चीन ह्या देशांचें सांस्कृतिक साम्य व हजारों वर्षांचे परस्पर-स्नेहाचे संबंध आणि जपान व जर्मनी ह्यांच्या राक्षसी महत्त्वाकांक्षेपासून राष्ट्रीय स्वातंत्र्य बाचवण्याचें दोघांस वाटत असलेलें अगत्य ह्यांचें दृष्टीनें चालू युद्धांत हिंदी लोकांनीं चिनी राष्ट्राशीं पूर्ण सहकार्य करण्याची आवश्यकता जनरॅलिसिमो व त्यांच्या पत्नी ह्यांनीं मोठ्या कळकळीनें प्रतिपादली आहे. ब्रिटिश सरकारासहि त्यांनीं हिंदुस्थानचें युद्धकार्य अधिक उत्साहानें होण्यासाठी स्वीकारावयाच्या प्रगतिपर धोरणासंबंधानें सूचना केली आहे. चिनी फौजा ब्रह्मदेशांत जपान विरुद्ध लढत असून थायलंड, सयाम व चीन ह्यांच्या सरहद्दीवर त्या शत्रूचा प्रतिकार करीत आहेत. येत्या सातव्या तारखेस "चीन-दिन" ह्या देशांत पाळण्यांत येणार आहे, त्याचा उद्देश हिंदुस्थान व चीन ह्या राष्ट्रांच्या सहकार्यास दृढता आणावी हाच आहे. प्रस्तुत युद्धांत आणि जगाच्या पुढील इतिहासांत चिनी जनरॅलिसिमो ह्यांची हिंदुस्थानास भेट हा अत्यंत महत्त्वाचा प्रसंग गणला जाईल ह्यांत संशय नाहीं.

---

## आकडेशास्त्रविषयक षण्मासिक

मुंबई येथील सिडनहॅम कॉलेजच्या स्टॅटिस्टिकल सोसायटीनें आकडे शास्त्रविषयक एक षण्मासिक सुरू केलें आहे. कॉलेजांतील तरुण संशोधक विद्यार्थ्यांचे आकडेशास्त्रविषयक उद्बोधक लेख प्रसिद्ध करणें व आकडेशास्त्रासंबंधीं महत्त्वाचे नवे प्रबंध सोप्या भाषेंत विद्यार्थ्यांस समजावून सांगणें, हा त्याचा उद्देश आहे. प्रो. संकपाळ हे त्याचे संपादक आहेत. पेट्रोल रेशनिंगचा मुंबईमधील शहरांतील वहातुकीवर परिणाम हा प्रो. संकपाळ ह्यांचा लेख मागेंच स्वतंत्रपणें प्रसिद्ध झाला होता व त्याची माहिती "अर्था"मध्यें देण्यांत आली होती. प्रो.संकपाळ ह्यांच्या आकड्यांवरून, पेट्रोल रेशनिंगनंतर भाड्याच्या मोटारींची संख्या घटलेली नाहीं, असें अनुमान डॉ. एस. आर. सवूर ह्यांनीं आपल्या छोट्या लेखांत काढलें आहे. मनुष्याच्या सर्वांगीण आयुष्यक्रमाविषयींच्या आकडेवार माहितीचें महत्त्व प्रो. दिवाण ह्यांनीं वर्णिलें आहे व शेवटीं प्रो. संकपाळ ह्यांचा मुंबई शहराच्या लोकसंख्येच्या अजमासासंबंधींचा लेख दिलेला आहे. षण्मासिकाचा उपक्रम स्तुत्य आहे.

---

## जी. आय. पी. रेल्वे

जुनी गॅरंटीड कंपनीची रेल्वे लाइन व इंडियन मिडलंड रेल्वे कंपनीची रेल्वे लाइन मिळून ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वे बनलेली आहे. बोरीबंदर ते ठाणें हा तिचा २१ मैलांचा फाटा प्रथम १८५३ मध्यें तयार झाला व ठाणें ते कल्याण हा फाटा १८५४ मध्यें वहातुकीस खुला झाला. कल्याण ते पुणें हा मार्ग कसकसा तयार होत गेला, ह्याची माहिती खाली दिली आहे:—

कल्याण ते कर्जत: १८५६
पळसद्री ते खंडाळा: १८६३
खंडाळा ते पुणें: १८५८

म्हणजे, घाटामधील रस्ता सुरू होण्यापूर्वी मुंबई ते कर्जत व खंडाळा ते पुणें वहातुकीस प्रारंभ झाला. पळसद्री ते खोपोली हा फाटा १८५६ सालींच तयार झाला.

जी. आय. पी. रेल्वेवरील सर्वांत बारीक त्रिज्येचें वळण बोरघाटांत ७५ आणि ७६ ह्या मैलांचें दरम्यान आहे. ह्या वळणाची त्रिज्या ९९० फूट आहे. घाटांतील उतार साधरणतः ३७ फुटांत १ फूट इतका आहे.

---

गरीब श्रीमंतीचा झगडा केव्हां संपेल

# संगम

नवयुग चित्र

भूमिका: मीनाक्षी, वत्सला कुमठेकर, साळवी, दामुअण्णा मालवणकर, जोग, विनायक

११ वा आठवडा

निर्माते:—विनायक.
लेखक:—खांडेकर
दिग्दर्शक:—जुन्नरकर

मिनर्व्हा—पुणें

रोज :—६॥ व १० वा.
शनि. रवि. सोम. मंगळ जादा खेळ ३। वा.

## सरकारी प्रॉमिसरी नोटा व स्टॉक सर्टिफिकिटें

"तुमचे सरकारी रोखे स्टॉकच्या स्वरूपांत ठेवणें सध्याच्या परिस्थितींत सर्वांत सुरक्षित आहे. पब्लिक डेट ऑफिस आपल्या प्रॉमिसरी नोटांचें स्टॉक सर्टिफिकेटस्मध्यें रूपांतर विनामूल्य करून देईल. त्यानंतर वॉरंटस्च्या स्वरूपांत व्याज दिलें जाईल. स्टॉकचें प्रॉमिसरी नोटांत पुनः रूपांतर मालकाच्या इच्छेनुरूप केव्हांहि करतां येईल व त्याबाबत फी आकारली जाणार नाहीं." रिझर्व्ह बँकेनें वरील प्रकारची जाहीर सूचना जनतेस केली आहे, तिचें जरा स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. हिंदी सरकारी कर्जरोखे मुख्यतः दोन प्रकारचे आहेत : (१) प्रॉमिसरी नोटा व (२) स्टॉक. स्टॉकचे स्वरूपांत कर्जरोखा धारण करणारास तो अमूक रुपयांच्या कर्जाचा मालक असल्याविषयींचें एक स्टॉक सर्टिफिकेट देण्यांत येतें. मालकाचें नांव पब्लिक डेट ऑफिसमध्यें नोंदलेलें असतें, तेव्हां स्टॉक विकल्यानें केवळ त्यावरील मालकीहक्क बदलत नाहीं. हा बदल पब्लिक डेट ऑफिसमध्यें नोंदला गेला पाहिजे. ह्याचा अर्थ, स्टॉक धारण करणारा निर्धास्त असूं शकतो. कारण, सर्टिफिकेट चोरीस गेलें अगर जळालें तरी त्याचा कर्जरोख्यावरील मालकीहक्क नाहींसा होत नाहीं. बिगर मालकाचे हातीं स्टॉक सर्टिफिकेट पडलें तरी त्यास त्याचा कांहीं उपयोग नाहीं; मूळ मालकास मात्र नवें सर्टिफिकेट मिळूं शकतें. सर्टिफिकेट दुसऱ्याचें नांवानें करावयाचें असलें तर त्यांतहि अडचण नसते. त्याबाबत छापील फॉर्म मिळतात. स्टॉक सर्टिफिकेटांवरील व्याज वॉरंटसच्या स्वरूपांत दिलें जातें व ह्या वॉरंटसचे आपण लिहून द्यावें त्या तिजोरींतून पैसे मिळूं शकतात. वरील वर्णनावरून, स्टॉक सर्टिफिकेटसचा सुरक्षितपणा स्पष्ट होईल. प्रॉमिसरी नोटांची देवघेव त्यांचे पाठीवर केवळ सही केल्यानें होऊं शकते व नोटेवरील व्याज घेतांना प्रॉमिसरी नोट दाखल करावी लागते. खोटी सही करण्याची तयारी असणाऱ्या व फौजदारीस तोंड देण्यास तयार असणाऱ्या मनुष्याचे हातीं प्रॉमिसरी नोटा पडणें धोक्याचें आहे. स्टॉक सर्टिफिकेटस् त्या मानानें अगदी निर्धास्त आहेत. स्टॉक सर्टिफिकेटस्पेक्षा प्रॉमिसरी नोटाच अधिक लोकप्रिय आहेत. सध्याच्या युद्धपरिस्थितींत लोकांनीं आपल्या सरकारी प्रॉमिसरी नोटांचें रूपांतर स्टॉक सर्टिफिकेटांत करून घ्यावें, अशी रिझर्व्ह बँकेची सूचना आहे. पुढें पुनः त्यांचें प्रॉमिसरी नोटांत रूपांतर करतांना रिझर्व्ह बँक फी घेणार नाहीं असें तिनें जाहीर केलें आहे.

## नाशिक कॉलेजांत रानडे शतसांवत्सरिक उत्सव

मुं. प्रां. सहकारी बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. वैकुंठराय मेहता, ह्यांनीं ता. ८ फेब्रुवारी रोजीं नाशिक येथील एच. पी. टी. कॉलेजांतील इतिहास व अर्थशास्त्रविषयक असोसिएशनमध्यें रानडे शतसांवत्सरिक दिनाचें प्रसंगानें न्यायमूर्तींच्या तैलचित्राचें अनावरण केलें. त्यावेळीं प्रिन्सिपॉल टी. ए. कुलकर्णी हे अध्यक्षस्थानीं होते. श्री. मेहता हे कै. ना. गोखल्यांचे शिष्य असल्याचें अध्यक्षांनीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितलें. रानड्यांचें तैलचित्र रा. ब. जी. व्ही. प्रधान ह्यांनीं असोसिएशनला नजर केलेलें आहे. श्री. मेहता ह्यांनीं आपल्या भाषणांत रानड्यांच्या थोरवीचें व कामगिरीचें मुद्देसूदपणें वर्णन केलें. नाशिक येथील न्यू हायस्कूल व सरस्वती विद्यालय ह्या संस्थांच्या द्वितीय वार्षिक स्नेहसंमेलनाचा बक्षिस समारंभहि श्री. मेहता ह्यांचे हस्तें पार पडला. शिक्षणक्रम संपवून बाहेर पडलेला विद्यार्थी व्यवहारांतील जबाबदाऱ्या पार पडण्यास समर्थ असणें व उत्तम नागरिक बनणें कसें जरूर आहे, हें त्यांनीं आपल्या भाषणांत स्पष्ट करून सांगितलें.


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

(सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली)

स्थापना १९११.

मुख्य कचेरी–सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग

९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## महायुद्ध दाराशीं आलें
## परदेशी औषधें
## दुर्मिळ व महाग झालीं

पण

भिण्याचें कारण नाहीं !!!

— कारण —

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

ह्या देशी औषधाच्या प्रसिद्ध कारखान्यानें तयार केलेलीं

- रक्तवर्धक,
- उपनाह,
- बालजीवन,
- कॅल्सीप्राल

इत्यादि पेटंट, स्टँडर्ड व लोकप्रिय औषधें खात्री पटल्यामुळें

★ डॉक्टर्सहि वापरूं लागले आहेत. ★

दरसाल बिनचूक नफा वाटणाऱ्या ह्या कंपनीचे शेअर्स व औषधें मागवा.

**आयुर्वेद रसशाळा पुणें लि०**

मुख्य दुकान गणपति चौक, लक्ष्मीरोड, पुणें २.

सर्व तऱ्हेची कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

## ' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—

भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटीसह टिकाऊ व मनपसंत

## साईन-बोर्डस्, रबरी शिक्के,

आकर्षक

## सिनेमा स्लाइडस् व पिक्चर पेंटिंग

सतत २० वर्षे विश्वसनीय व वेळेवर मिळण्याचें एकच ठिकाण


## पेन्टर ए. जी. बेडेकर

( मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट )

बुधवार चौक, पुणें २ ( सिटी )

बाहेरगांवचीं कामें व्यवस्थित व वेळेवर पाठवूं.

# कॉमनवेल्थचा वैभवशाली विस्तार



हेड ऑफिस बिल्डिंग

★ २७ हजारांचेवर पॉलिसी–होल्डर्स
★ एकूण चालू विमे २ कोटीचेवर
★ दोन हजारांहून अधिक कार्यकर्ते निरनिराळ्या प्रांतांत कॉमनवेल्थसाठी उत्साहानें काम करीत आहेत.

# कॉमनवेल्थ

अॅशुअरन्स कंपनी लि.

चेअरमन

● खा. ब. एम्. एन्. मेथा, C. I. E., M. B. E.

ॲक्टिंग ऑफिस सुपरिन्टेंडेंट ● एम्. एन्. भागवत, B. A.

' कॉमनवेल्थ ' ची पॉलिसी घेऊन जीवन निश्चिंत व सुखी करा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीराम् वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.